**तरुणाईच्या जल्लोषाला उत्साहात सुरुवात : युवा महोत्सवाचे थाटात उद्घाटन**

**आभासी जगातून बाहेर येऊन मानवी नाते वृद्धिंगत करा - हर्षवर्धन देशमुख**

**आपल्या कलागुणांचे करिअर मध्ये रुपांतर करा - डॉ.दिलीप मालखेडे**

**अमरावती -** आपण अजूनही कोविडच्या छायेतून बाहेर निघालो नसून आभासी दुनियेत जगताना एकमेकांपासून दूर जात आहोत. आपण सर्व करतो पण काहीच करत नाही, अशी आपली अवस्था असून या मानसिक तणावातून बाहेर काढण्यासाठी युवा महोत्सवासारख्या महोत्सवाची गरज असल्याचे प्रतिपादन 'युवा महोत्सव २०२२' चे उद्घाटक आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवाचे आयोजन करण्याचा बहुमान श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाला पहिल्यांदाच मिळाला असून या महोत्सवाचे उद्घाटन शहरातील सर्वात भव्य व वातानुकूलित अशा श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आज संपन्न झाले. या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी हर्षवर्धन देशमुख बोलत होते. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.दिलीप मालखेडे यांच्या अध्यक्षतेत झालेल्या या समारंभाला आमदार सौ.सुलभाताई खोडके, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, अमरावती विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.केशव तुपे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.तुषार देशमुख, मुख्य संयोजक प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे, विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.राजीव बोरकर, महोत्सवाचे समन्वयक डॉ.सुभाष गावंडे, सहसमन्वयक डॉ.वैशाली देशमुख,युवा महोत्सव निवड समितीचे अध्यक्ष डॉ.प्रफुल्ल गवई, सदस्य डॉ.जयश्री वैष्णव, डॉ.निखिलेश नलोडे, डॉ.रेखा मग्गीरवार, डॉ.गजानन केतकर प्रामुख्याने उपस्थित होते.

जग संकुचित होत चालले आहे, आपण स्वतःच्या व आपल्या परिवाराच्या पलीकडे बघायला तयार नाही. आपण एकमेकाच्या सुखदुखात सहभागी होत नाही, नव्या आभासी जगाने खूप काही चांगल्या गोष्टी साध्य झाल्या असल्या तरी समाजातील संवाद संपवण्याचा धोका निर्माण झाला आहे त्यामुळे सर्वांनी आभासी जगातून बाहेर येऊन मानवी नाते वृद्धिंगत करावे, असे आवाहनही त्यांनी केले. विद्यापीठाने केवळ विद्यापीठस्तरावर नव्हे तर जिल्हास्तरावरसुद्धा सांस्कृतिक आणि क्रीडा महोत्सव आयोजित करून त्यात प्रत्यक्ष सहभाग कसा वाढेल, या साठी प्रयत्न करण्याची गरज हर्षवर्धन देशमुख यांनी व्यक्त करून विद्यापीठाच्या अशा उपक्रमासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्था आवश्यक ते सहकार्य करेल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

**कुलगुरू डॉ.दिलीप मालखेडे**

विद्यापीठाचे काम केवळ शिक्षण देणे एवढेच नसून माणसे घडविणे हे आहे, त्यासाठी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे, क्रीडाक्षेत्रात विद्यार्थ्यांना संधी आवश्यक असून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ हे काम सातत्याने करीत असल्याचे प्रतिपादन 'युवा महोत्सव २०२२' च्या उद्घाटन समारंभाचे अध्यक्ष कुलगुरू डॉ.दिलीप मालखेडे यांनी केले.

केवळ विद्यापीठच नव्हे तर प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना विकसित करण्यासाठी एक दालन असावे, तेथे विद्यार्थ्यांचा कायम सराव चालवा, याची आज गरज असल्याचे नमूद करून विद्यापीठात खुले प्रेक्षागृह आणि आंतर प्रेक्षागृह उभारण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थी आपल्या कलागुणांच्या भरवशावर आपला उदरनिर्वाह करू शकला पाहिजे, असे सांगून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांची उदाहरणे दिली व कलेचे करिअर मध्ये रुपांतर करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

**डॉ.केशव तुपे**

कला ही रंजनाचे साधन न राहता कोणत्याही प्रकारच्या सत्ताशक्तीला आव्हान देण्याचे काम त्यातून झाले पाहिजे. हजारो वर्षांपासून आपले कवी, लेखक, कलावंत हे काम आपल्या कलेतून करत असून त्या अंगाने कलेकडे पहिले पाहिजे.समाजातील वास्तव आपल्या कलेतून मांडून समाजाला दिशा देण्याचे काम कलावंतांनी केले पाहिजे, असे आवाहन अमरावती विभागाचे उच्च शिक्षण सहसंचालक डॉ.केशव तुपे यांनी करून शासनाच्या वतीने युवा महोत्सवातील कलावंतांना शुभेच्छा दिल्या.

**आमदार सौ.सुलभाताई खोडके**

महाविद्यालयीन जीवनात आपल्यातील कलागुणांना विकसित करण्याची जी संधी मिळते त्यातून जीवनाला आकार मिळत असतो, एक ऊर्जा मिळत असते. श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयातून विद्यार्थी म्हणून आपल्याला जी ऊर्जा मिळाली त्यातून मी आमदार होऊ शकले, अशी महाविद्यालायाप्रती कृतज्ञता व्यक्त करत अमरावतीच्या आमदार सौ.सुलभाताई खोडके यांनी नव्या तरुणाईला शुभेच्छा दिल्या. अमरावती विद्यापीठात युवा महोत्सवासाठी कायम सभागृह असावे, त्यासाठी विद्यापीठाने एक प्रस्ताव शासनाला पाठवावा, आपण सर्व ते सहकार्य करू असे आश्वासनही त्यांनी दिले.

**दिलीपबाबू इंगोले**

युवा महोत्सव एक पर्वणी असते, आपले कलागुण सादर करण्याचा हा एक महोत्सव असतो. कलावंत घडविण्याचे काम या महोत्सवातून होते, त्यामुळे या महोत्सवाचा भरपूर आनंद घ्या व आपल्या कलागुणांना विकसित करा, असे आवाहन करत श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष

दिलीपबाबू इंगोले यांनी कलावंतांना शुभेच्छा दिल्या. कुलसचिव डॉ.तुषार देशमुख यांनी देखील आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

'युवा महोत्सव २०२२' चे मुख्य संयोजक व श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे यांनी आपल्या स्वागतपर भाषणातून पाहुण्यांचे व कलावंतांचे स्वागत करण्यासोबतच महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख आपल्या भाषणातून मांडला. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.राजीव बोरकर यांनी प्रास्ताविकातून युवा महोत्सवाच्या आयोजनाची भूमिका मांडली. या महोत्सवात १७९ महाविद्यालयातील सुमारे पाच हजार विद्यार्थी २७ कालाप्रकारातून आपले कलागुण सादर करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या सोहळयात मागील वर्षीच्या 'युवा महोत्सव २०२१' चे संयोजक ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक धोटे व त्यांचे सहकारी डॉ.संजय ईश्वरकर आणि डॉ. किरण सांगवे यांचा तसेच कलावंताचे प्रातिनिधिक स्तरावर स्वागत म्हणून श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी व प्रसिद्ध गजल गायक दिव्यांग मुकेश गोरले याचा पाहुण्यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. महोत्सवाच्या आयोजनात पहिल्यांदाच अशाप्रकारे सत्कार करण्यात आल्याने पाहुण्यांनी आयोजकांचे कौतुक केले.

'युवा महोत्सव २०२२'च्या उद्घाटन समारंभाचे संचालन डॉ.राजेश मिरगे यांनी केले तर महोत्सवाचे समन्वयक डॉ.सुभाष गावंडे यांनी आभार मानले. श्री शिवाजी कला व वाणिज्य महविद्यालयात पाहुण्यांचे आगमन झाल्यानंतर प्रारंभी शिक्षणमहर्षी यांच्या पुतळयाला अभिवादन करण्यात आले.पाहुणे मंडळी छत्रपती शिवाजी महाराज सभागृहाच्या प्रांगणात पोहचल्यानंतर ढोल-ताशा पथकाने व एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी त्यांचे स्वागत केले. तेथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाला अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ गीताने समारंभाची सुरुवात झाली.महाविद्यालयाच्या संगीत विभागाने स्वागतगीत सादर केले.कार्यक्रमाला विद्यापीठ परिक्षेत्रातील प्राचार्य, प्राध्यापक, अधिकारी, विद्यार्थी व मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

........................................................................

सोबत फोटो